भारतीय पृथ्वि विज्ञान मंत्रालय, भारतीय हवामान शास्त्र विभाग आणि
डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली सहयोगीत

# ग्रामिण कृषि मौसम सेवा

उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे ता. कुडाळ, जि. सिंधुदुर्ग

## हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला पत्रक - सिंधुदुर्ग

कालावधी (दिनांक २१.०४.२०२१ ते २५.०४.२०२१)

| अंक ३२/२०२१ | | | | | | | दिनांक २०.०४.२०२१ | कालावधी ५ दिवस | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मागील आठवड्यातील हवामान घटकांची प्रत्यक्ष नोंद (१३/०४/२०२१ ते १९/०४/२०२१ पर्यंत) | | | | | | | हवामानाचे घटक | पुढील पाच दिवसांचे हवामान घटकांचे पुर्वानुमान (वैधता २१.०४.२०२१ ते २५.०४.२०२१ पर्यंत) | | | | |
| १३/०४ | १४/०४ | १५/०४ | १६/०४ | १७/०४ | १८/०४ | १९/०४ | दिनांक | २१/०४ | २२/०४ | २३/०४ | २४/०४ | २५/०४ |
| ०.० | १३.२ | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मि. मी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३९.० | ३६.० | ३७.५ | ३७.० | ३७.५ | ३८.० | ३७.० | कमाल तापमान (अं. से) | ३५ | ३६ | ३६ | ३६ | ३७ |
| २३.० | २२.५ | २२.५ | २३.६ | २३.० | २३.० | २२.० | किमान तापमान (अं. से) | २४ | २५ | २५ | २५ | २५ |
| ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) सकाळ | २ | ५ | ४ | ४ | ० |
| ढगाळ | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | निरभ्र | ढगाळ | ढगाळ | मेघाच्छादन (ऑक्टा.) दुपार | | | | | |
| ८४ | ९२ | ८४ | ७३ | ८४ | ९२ | ८४ | सकाळची सापेक्ष आर्द्रता(%) | ७८ | ७९ | ७५ | ७९ | ७८ |
| ४९ | ४७ | ४३ | ५३ | ४४ | ३९ | ६२ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ६८ | ६५ | ६५ | ६६ | ६७ |
| १.७ | २.६ | १.७ | २.१ | २.१ | १.८ | १.९ | वा-याचा वेग (कि.मी/तास) | ००६ | ००७ | ००४ | ००६ | ००७ |
| स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | स्थिर | वा-याची दिशा सकाळ | दक्षिणोत्तर/ नैऋत्ये कडे | दक्षिणे कडे | पुर्वोत्तर/ आग्नेय कडे | दक्षिणोत्तर/ आग्नेय कडे | दक्षिणोत्तर/ आग्नेय कडे |
| पश्चिमोत्तर/ वायव्ये कडे | पश्चिमोत्तर/ वायव्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | पश्चिमोत्तर/ वायव्ये कडे | पश्चिमोत्तर/ नैऋत्ये कडे | वा-याची दिशा दुपार | | | | | |

| मागील वर्षातील (२०२०) पर्जन्य (मि. मी) | १/०१/२०२१ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | १/०६/२०२१ पासुनचे पर्जन्य (मि. मी) | मागील आठवड्यातील पर्जन्य (मि.मी) |
|---|---|---|---|
| ४८६०.० | २४.८ | ०.० | ०.० |

| | | |
|---|---|---|
| पुढील ५ दिवसाच्या हवामानाची सामान्य स्थिती | | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पुढील पाच दिवसामध्ये पर्जन्यमान कोरडे राहण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर कमाल व किमान तापमानात वाढ होऊन ते अनुक्रमे ३५ ते ३७ व २४ ते २५ अंश सेल्सीअस वरती स्थिर राहण्याची शक्यता आहे त्याचबरोबर आर्द्रतेमध्येही वाढ संभवत आहे. तसेच हवामान कोरडे व अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता आहे. असा अंदाज प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्याकडून वर्तविण्यात आला आहे. |
| विस्तारीत श्रेणीतील हवामान अंदाज | पर्जन्यमान | दक्षिण कोकण व गोवा या हवामान उपविभागामध्ये दिनांक २५ एप्रिल ते ०१ मे या कालावधी दरम्यान पर्जन्यमान सरासरीपेक्षा जास्त होण्याची शक्यता आहे. (सदर कालावधी दरम्यान ०.१३ मिमी एवढे सरासरी पर्जन्यमान असते तरी या वर्षी सदर कालावधी दरम्यान ०.१८ मिमी पर्जन्यमान होण्याची शक्यता आहे व ते सरासरीपेक्षा ३६.१० टक्क्यांनी जास्त होण्याची शक्यता आहे.) |
| | कमाल व किमान तापमान | दक्षिण कोकण व गोवा या हवामान उपविभागामध्ये दिनांक २५ एप्रिल ते ०१ मे या कालावधी दरम्यान कमाल तापमान सरासरी एवढे व किमान तापमान सरासरीपेक्षा जास्त असण्याची शक्यता आहे. (सदर कालावधी दरम्यान सरासरी कमाल व किमान तापमान अनुक्रमे ३५.२५ व २३.७० डीग्री सेल्सीअस एवढे असते तरी या वर्षी सदर कालावधी दरम्यान ते अनुक्रमे ३५.२४ व २४.०५ डीग्री सेल्सीअस एवढे असण्याची शक्यता आहे तर फक्त किमान तापमान सरासरीपेक्षा ०.३५ डीग्री सेल्सीअसने जास्त असण्याची शक्यता आहे.) |
| इशारा | | सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये पुढील पाच दिवसासाठी प्रादेशिक हवामानशास्त्र केंद्र, मुंबई यांच्या कडून हवामानासंबधी कोणताही ईशारा देण्यात आलेला नाही. |
| सर्वसाधारण कृषि सल्ला | | येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात होणारी वाढ लक्षात घेता कोंबडयांचे उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी शेडला बाहेरुन कापडी पडदे लावून त्यावर पाणी शिंपडावे. तसेच शेडच्या छतावर गवताचे किंवा गोणपाटाचे आच्छादन घालावे व त्यावर पाणी शिंपडावे. कोंबडयांना तसेच पिल्लांना पिण्यासाठी स्वच्छ गार पाण्याचा पुरवठा करावा. |
| संक्षिप्त संदेश सल्ला | | कोरड्या हवामानाची शक्यता लक्षात घेता उन्हाळी भात, भुईमुग व रब्बी डाळवर्गीय पिकांची काढणीची कामे हाती घेण्यात यावी. |

## हवामान अंदाजावर आधारीत कृषि सल्ला

| पिकाचे नाव | पिकाची अवस्था | पिक निहाय कृषि सल्ला |
|---|---|---|
| आंबा | काढणी | गेल्या आठवड्यामध्ये ज्या ठिकाणी हलक्या स्वरुपाचा पाऊस झाला आहे अशा ठिकाणी अपरीपक्व व काढणीस तयार न झालेल्या फळांवर पाउसामुळे करपा रोगाचा प्रादुर्भाव होऊन डाग पडु नये व नुकसान होऊ नये यासाठी आंबा पिकावर कार्बेन्डॅझीम ५० टक्के पाण्यात विरघळणारी पावडर (१० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात) किंवा थायोफिनेट मिथिल ५० टक्के पाण्यात विरघळणारी पावडर (१० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात) किंवा प्रोपिनेप ७५ टक्के पाण्यात विरघळणारी पावडर (२० ग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात) यापैकी कोणत्याही एका बुरशीनाशकाची गरजेनुसार फवारणी करावी.<br>फळे पिकात घालताना फळ कुजीचा प्रादुर्भाव वाढु नये यासाठी फळांना उष्ण जल प्रक्रिया द्यावी. त्यासाठी फळे ५२ अंश से. तापमानाच्या पाण्यात १० मिनीटे बुडवुन नंतर आडीत घालावीत.<br>गेल्या आठवड्यामध्ये ज्या ठिकाणी हलक्या स्वरुपाचा पाऊस झाला आहे अशा ठिकाणी फळमाशीच्या नियंत्रणासाठी विद्यापीठाने विकसित केलेले मिथिल युजिनॉलयुक्त रक्षक सापळे प्रती हेक्टरी चार याप्रमाणात आंबा बागेमध्य लावावेत.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात होणारी वाढ लक्षात घेता फळगळ टाळण्यासाठी पाण्याची उपलब्धता असल्यास झाडांना विस्तारानुसार प्रति झाड ८०-१०० लि. पाणी ७ दिवसांच्या अंतराने दयावे.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात होणारी वाढ लक्षात घेता बाष्पीभवन कमी करण्यासाठी जांभा जमिनीमधील आंबा कलमांना गवताचे व पालापाचोळ्याचे अच्छादन दयावे.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात होणारी वाढ लक्षात घेता नविन लागवड केलेल्या आंबा कलमांना उन्हापासुन संरक्षणासाठी शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी.<br>जिल्ह्यामध्ये आंबा पीकामध्ये काही ठिकाणी अंडाकृती फळे व मोठया आकाराची काढणीची फळे अशी अवस्था आहे. जिल्ह्यामध्ये |

| | | |
|---|---|---|
| | | तापमान वाढ संभवत असल्याने तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर नुतन झेल्याच्या सहाय्याने ८० ते ८५ % (चौदा आणे) पक्वतेला काढावीत. फळे काढणीच्या किमान ८ दिवस अगोदर झाडावर कोणतेही औषध फवारु नये.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात होणारी वाढ लक्षात घेता तापमान वाढीमुळे हापुस आंबा फळांमध्ये साक्याचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. साका टाळण्यासाठी व उष्णतेपासून बचाव करण्यासाठी तयार फळे सकाळी दहाच्या अगोदर व दुपारी चारच्या नंतर काढावीत व सावलीत ठेवावीत. ऊन्हामध्ये फळांची वाहतुक करु नये.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात होणारी वाढ लक्षात घेता आंब्यातील फळगळ टाळण्यासाठी फळांना विद्यापीठ शिफारसीनुसार कागदी पिशव्यांचे आच्छादन करण्यात यावे. |
| काजु | काढणी | काजूमध्ये ज्या ठिकाणी काढणीयोग्य बी तयार झालेली आहे अशा ठिकाणी तयार झालेल्या बीयांची काढणी व वेचणी लवकरात लवकर करुन घ्यावी व बीया उन्हामध्ये योग्यप्रकारे वाळवाव्यात.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात होणारी वाढ लक्षात घेता नविन लागवड केलेल्या काजु कलमांना उन्हापासुन संरक्षणासाठी शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात होणारी वाढ लक्षात घेता काजुच्या मोठया लागत्या कलमांना १५ दिवसाच्या अंतराने १५० - २०० लीटर पाणी प्रति कलम यापमाणे द्यावे.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात होणारी वाढ लक्षात घेता नवीन लागवड केलेल्या कलमांना पहिल्या २ वर्षात उन्हाळयात ८ दिवसांच्या अंतराने ३० ली. पाणी प्रति कलम यापमाणे द्यावे. |
| नारळ | फळधारणा | येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात होणारी वाढ लक्षात घेता नारळ बागेस ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात होणारी वाढ लक्षात घेता नविन लागवड केलेल्या नारळ रोपांना उन्हापासुन संरक्षणासाठी शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी.<br>नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी भुंग्याने पाडलेली भोके १० टक्के कार्बारील भुकटी व वाळूने बुजवून घ्यावीत. तसेच खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटच्या सहाय्याने १५ ते २० से.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० मि.ली. ३६ टक्के प्रवाही मोनोक्रोटोफॉस नरसाळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे. |
| सुपारी | फळधारणा | येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात होणारी वाढ लक्षात घेता सुपारी बागेस ८ ते १० दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी.<br>येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात होणारी वाढ लक्षात घेता नविन लागवड केलेल्या सुपारीच्या रोपांना उन्हापासुन संरक्षणासाठी शेडनेटच्या सहाय्याने सावली तयार करावी. |
| वायंगणी भात | पक्वता | काही ठिकाणी भात पीक हे दाना भरण्याच्या अवस्थेत आहे. भात पिकाला नियमितपणे ४ ते ५ दिवसाच्या अंतराने पाणी द्यावे<br>भाताच्या काही जातींमध्ये भात पीक कापनीच्या अवस्थेत आहे. कापणीपूर्वी ८ ते १० दिवस अगोदर शेतातील पाणी काढून दयावे. तयार झालेल्या वायंगणी भाताची कापणी विद्यापीठाने प्रसारित केलेल्या वैभव विळ्याच्या साहायाने जमिनीलगत करावी |
| भुईमुग | शेंगा अवस्था | काही ठिकाणी भुईमुग पीक पक्व होण्याच्या अवस्थेत आहे. काढणीसाठी तयार झालेल्या भुईमुगाची पाने पीवळी होउन गळू लागल्यास तसेच शेंगेच्या आतील साल काळसर व शेंगदाण्यास योग्य रंग आला असल्यास काढणी करावी. काढणी केलेल्या शेंगा उन्हामध्ये ४ ते ५ दिवस वाळवून नंतर साठवणूक करावी.<br>काही ठिकाणी भुईमुग पीक दाणे भरण्याच्या अवस्थेत आहे. उष्णतेमध्ये वाढ होत असल्याने भुईमुग पीकाला दाणे भरण्याच्या अवस्थेमध्ये गरज असल्यास जादा पाणी दयावे. |
| कुळीथ | काढणी | कुळीथ पिकाची काढणी लवकरात लवकर ऊरकुन घ्यावी. तयार झालेल्या शेंगा सकाळच्या वेळेस काढुन उन्हात चांगल्या वाळवाव्यात. |
| चवळी | काढणी | चवळी पिकाची काढणी लवकरात लवकर ऊरकुन घ्यावी. तयार झालेल्या शेंगा सकाळच्या वेळेस काढुन उन्हात चांगल्या वाळवाव्यात. |
| कडवा वाल | काढणी | वाल पिकाची काढणी लवकरात लवकर ऊरकुन घ्यावी. तयार झालेल्या शेंगा सकाळच्या वेळेस काढुन उन्हात चांगल्या वाळवाव्यात. |
| मिरची | फुलोरा ते फळधारणा | मिरचीवर बोकड्या किंवा चुरडा मुरडा रोगाचा प्रादुर्भाव आढळुन आल्यास रोग नियंत्रणासाठी व रोगकारक किडींच्या उदा. फुलकिडे व पाढरी माशींच्या नियंत्रणासाठी लागवडीनंतर १५ दिवसांनी फोरेट १० कि./हे. दयावे तसेच डायमिथोएट ३०% प्रवाही १ मिली + गंधक २ ग्रम किंवा मॅन्कोझेब २ ग्रम प्रती लिटर पाण्यात मिसळुन पुर्नलागवडीनंतर १० ते १५ दिवसांच्या अंतराने फवारावे. |
| दुभती जनावरे | - | येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात होणारी वाढ लक्षात घेता जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ थंड पाणी व उपलब्ध असल्यास खाण्यासाठी हिरव्या ओल्या चा-याची व्यवस्था करावी.<br>जनावरांचे दुपारच्या उष्णतेपासून योग्य ते संरक्षण करावे. गोठयामध्ये हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी. |
| कुक्कुटपालन | - | येत्या ५ दिवसांमध्ये कमाल व किमान तापमानात होणारी वाढ लक्षात घेता कोंबडयांचे उष्णतेपासून संरक्षण करण्यासाठी शेडला बाहेरुन कापडी पडदे लावून त्यावर पाणी शिंपडावे. तसेच शेडच्या छतावर गवताचे किंवा गोणपाटाचे आच्छादन घालावे व त्यावर पाणी शिंपडावे. कोंबडयांना तसेच पिल्लांना पिण्यासाठी स्वच्छ गार पाण्याचा पुरवठा करावा. |
| माती परिक्षण | - | जमिनीतील नत्र, स्फुरद व पालाशाचे प्रमाण तपासण्यासाठी रब्बी/ऊन्हाळी पीकाची काढणी केल्यानंतर लगेचच मातीचा नमुना घ्यावा व तपासणीसाठी जवळच्या माती परीक्षण प्रयोगशाळेकडे पाठवावा. मातीचा नमुना कसा घ्यावा याबाबत अधिक माहितीसाठी मृद शास्त्रज्ञ, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला यांचेकडे संपर्क साधावा. (दुरध्वनी क्र. ०२३६६.२६२२३४) |

**सदर कृषि सल्ला पत्रिका ही डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ले व उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे येथील "ग्रामीण कृषि मौसम सेवा" योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशी वरुन तयार करुन प्रकाशित करण्यात आली.**

| | |
|---|---|
| डॉ. प्रदिप चं. हळदवणेकर<br>सहयोगी अधिष्ठाता तथा नोडल ऑफिसर<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ | डॉ. यशवंत चं. मुठाळ<br>तांत्रिक अधिकारी<br>कृषी हवामानशास्त्रीय क्षेत्र एकक<br>ग्रामिण कृषि मौसम सेवा<br>उद्यानविद्या महाविद्यालय, मुळदे<br>०२३६२-२४४२३१ |